कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे

# सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अ.नगर

**प्रास्ताविक :-**

शिक्षण हे एक व्यक्तिविकासाचे व समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिविकास आणि व्यक्तिविकासातूनच समाज विकास साधला जातो. या विचारधारेवर अढळ श्रद्धा असणारे, रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करणारे, कर्मवीरांपासून घेतलेला वसा आणि वारसा नेटाने पुढे चालविणारे कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक शिक्षण महर्षी मा. खासदार स्व. शंकररावजी काळे साहेब यांच्या प्रेरणेने तसेच संस्थेचे विद्यमान पदाधिकारी, सदस्य यांच्या प्रयत्नाने जून २००२ मध्ये संस्थेने गौतमनगर - कोळपेवाडी येथे पुणे विद्यापीठाशी संलग्न, शासनमान्य कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरु केले आहे. १ ऑगस्ट २००२ रोजी आमचे महाविद्यालय कला व वाणिज्य शाखेसह १२० या विद्यार्थी संख्येवर गौतम पब्लिक स्कुलच्या इमारतीत सुरु करण्यात आले. १४ जानेवारी २००८ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते नवीन इमारतीचे उद्‌घाटन होऊन महाविद्यालय नवीन स्वतंत्र इमारतीत स्थलांतरीत झाले आहे. १५ जून २०११ रोजी विज्ञान विभागही सुरु करण्यात आला आहे.

सध्याच्या स्पर्धात्मक, गतिमान युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे पडू नयेत, त्यांना भविष्यकाळात समर्थपणे प्राप्त परिस्थितीला सामोरे जाता यावे, यातूनच उद्याचे जबाबदार नागरिक तयार व्हावेत म्हणून तशी संधी त्यांना प्राप्त करुन देण्याच्या उदात्त हेतूने विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या उच्च शिक्षणाची होत असलेली हेळसांड थांबावी, तसेच शेतकरी, शेतमजूर, कामगार या आर्थिक दुर्बल घटकांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशानेच हे महाविद्यालय कोळपेवाडी सारख्या ग्रामीण भागात सुरु करण्यात आले आहे. कोपरगांव तालुक्याबरोबरच सिन्नर, निफाड व राहाता तालुक्यातील विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

कला, वाणिज्य आणि विज्ञान या विद्याशाखांमध्ये पदवी पर्यंतचे कसदार शिक्षण देतांना व त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांचे आयोजन आम्ही केले आहे. गेल्या सतरा वर्षापासूनचे विद्यापीठीय परीक्षेचे आमचे सर्वच निकाल ८०% ते ९०% दरम्यान आहेत. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन शिक्षणक्रम पूर्ण करु इच्छिणाऱ्यांना हे माहितीपत्रक निश्चितच मार्गदर्शक ठरेल असा आम्हास विश्वास वाटतो.

उच्च शिक्षण घेऊन आमच्या महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, वकील, उद्योजक, प्रशासकीय व सरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी, जनसंपर्क माध्यमे, कृषी उद्योग, सहकार, राजकारण, बँका इ. विविध क्षेत्रात कार्यरत झालेले आहेत. ही उज्वल परंपरा अशीच पुढे चालू राहील. उद्याचे सुसंस्कृत जबाबदार नागरिक घडविणे हेच आमच्या संस्थेचे ध्येय आहे.

यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन! तसेच यशस्वी महाविद्यालयीन कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा..!

प्राचार्या

# -: उपलब्ध विविध शैक्षणिक सुविधा :-

❖ **इमारत :-**

महाविद्यालयाच्या विज्ञान प्रयोगशाळेसह २६ खोल्यांची भव्य व सुसज्ज अशी इमारत शिर्डी-सुरत महामार्गाशेजारी बांधून पूर्ण झाली आहे.

❖ **ग्रंथालय :-**

महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज व संपन्न असे आहे. त्यामध्ये तिनही शाखांची क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, विविध नियतकालिके, वृत्तपत्रे, सामान्यज्ञान, स्पर्धा-परीक्षा व नोकरीविषयक मासिके व पुस्तके यांचा समावेश आहे. ग्रंथालयाचे कामकाज संगणक प्रणालीनुसार चालते.

ग्रंथालयाच्या शेजारीच विद्यार्थ्यांच्या सोईच्या दृष्टीने अभ्यासिकेची सोय करण्यात आलेली आहे. गरजू व गरीब विद्यार्थ्यांना त्याचा अधिक फायदा होतो. ग्रंथालय व अभ्यासिका सुट्टीच्या दिवसांव्यतिरिक्त सकाळी ९.०० ते १.०० व दुपारी ३.०० ते ५.०० या काळात विद्यार्थ्यांसाठी खुली असते.

❖ **प्रयोगशाळा :-**

१) महाविद्यालयात पदवी स्तरावर मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल हे विषय विशेष स्तरावर शिकविले जातात. भूगोल विषयासाठी सुसज्ज अशी भूगोल प्रयोगशाळा महाविद्यालयात उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयामध्ये अशी सुविधा अभावानेच आढळते. अशी सुविधा पुरविणारे ग्रामीण भागातील आमचे एकमेव महाविद्यालय आहे.

२) विज्ञान विभागासाठी Physics, Chemistry, Botany, Zoology, Maths आणि Computer या विषयांच्या सुसज्ज व भव्य प्रयोगशाळा 'कर्मवीर शंकरराव काळे विज्ञानभवन' मध्ये उभारण्यात आल्या आहेत. तसेच बॉटनिकल गार्डनची उभारणी केलेली आहे.

३) वाणिज्य प्रयोगशाळा - वाणिज्य विभागासाठी अभ्यासक्रमाविषयी विविध चार्टस् आणि बोर्डस् तसेच प्रोजेक्टर सुविधेसह उद्योजक, उद्योजकांची माहिती, आत्मचरित्रे, औद्योगिक आस्थापनांची माहिती वाणिज्य प्रयोगशाळेत उपलब्ध आहे.

४) संगणक लॅब - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी उपलब्ध असलेल्या 'Soft Skill Development Programme' साठी लिंग्वा फोन लॅब महाविद्यालयात उपलब्ध आहे. तसेच संगणक लॅबची सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

❖ **क्रीडा विभाग :-**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व शारीरिक व क्रीडा कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने भव्य क्रीडांगण सुविधा उपलब्ध करुन देण्यात आले आहे. देशी-विदेशी खेळांचे साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले जाते. बास्केटबॉल, हॉकी, फुटबॉल, क्रिकेट, खो-खो यांची स्वतंत्र क्रीडांगणे व जलतरण सुविधा आहेत. खेळाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण संचालकांमार्फत योग्य मार्गदर्शन केले जाते. तसेच पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने अत्याधुनिक जिमची सुविधा महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केली आहे.

### ❖ राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) :-

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट कार्यरत आहे. महाविद्यालयातील युवक युवतींमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करुन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सदर योजना राबविली जाते. ही योजना ऐच्छिक स्वरुपाची असून दरवर्षी २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींना या योजनेत प्रवेश दिला जातो. सलग दोन वर्ष या योजनेत भाग घेऊन सात दिवसाचे हिवाळी अधिवेशन पूर्ण केल्यानंतरच विद्यार्थ्यास शिबीर प्रमाणपत्र दिले जाते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत अशा विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार बोनस गुण म्हणून दिले जातात. तसेच सदर योजना यशस्वी व समाधानकारकपणे पूर्ण केल्यास प्रमाणपत्र धारकास पुढील शिक्षणासाठी (उदा. बी.एड.) प्रवेश घेताना वाढीव गुण मिळतात. सदर योजनेत विद्यार्थ्यास वर्षभर १००% हजेरी पूर्ण करणे बंधनकारक आहे. एन.एस.एस. प्रवेशासाठी ऑनलाईन स्वतंत्र फॉर्म फी सह भरणे आवश्यक आहे.

### ❖ कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :-

'मागेल त्या गरजू विद्यार्थ्यास काम' पुणे विद्यापीठाची ही योजना महाविद्यालय स्थापनेपासून सुरु आहे. गरीब व होतकरु तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी ही योजना आहे. सध्या १०० विद्यार्थी-विद्यार्थीनी या योजनेचा लाभ घेत आहेत.

### ❖ स्पर्धा-परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-

यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी., स्टाफ सिलेक्शन कमिशन, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, रेल्वे भरती, बँक भरती, बी.एड. तसेच विविध व्यवस्थापन अभ्यासक्रम, सामायिक प्रवेश परिक्षा इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करीत असतात. अशा प्रकारचे स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र महाविद्यालयात कार्यरत आहे. त्याचा अनेक विद्यार्थी लाभ घेतात. तसेच नोकरीसाठी एम्प्लॉयमेंट न्यूज व नोकरी संदर्भ ही दोन्हीही साप्ताहिके विद्यार्थ्यांसाठी सुरु केली आहेत.

### ❖ विद्यार्थी सामुहिक विमा योजना :-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार सर्व विद्यार्थ्यांचा एका वर्षासाठी सामुदायिक विमा घेण्यात येतो. शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास रु. १,००,०००/- व अपघात अपंगत्व आल्यास किंवा औषधोपचारासाठी किमान रु. ५०,०००/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून विमा कंपनीकडून मिळते. अपघात झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याच्या पालकांनी महाविद्यालयाकडे त्वरीत नोंद देऊन आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेतल्यानंतरच विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळते.

### ❖ विद्यार्थी संसद :-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे गुणवत्तेनुसार वरिष्ठ महाविद्यालयातील वर्ग प्रतिनिधी व विद्यापीठ प्रतिनिधींची निवड केली जाते.

### ❖ ग्रंथालय व अभ्यासिका नियमावली :–

१) ग्रंथालयात अगर अभ्यासिकेत प्रवेश करतांना प्रत्येक विद्यार्थ्याजवळ स्वतःचे ओळखपत्र असावे.

२) स्वतःच्या ओळखपत्रावर फक्त अभ्यासिकेत बसून वाचण्यासाठी पुस्तके, मासिके प्रश्नपत्रिकेचे संच दिले जातील. अभ्यासिका सोडण्यापूर्वी घेतलेले पुस्तक, मासिक अथवा प्रश्नपत्रिकासंच ग्रंथपालाकडे परत करणे आवश्यक आहे.

३) ग्रंथालय / अभ्यासिकेत गोंगाट करणे, मोठ्याने बोलणे, मोबाईलचा वापर इत्यादी उपद्रवकारक गोष्टी कटाक्षाने टाळून अभ्यासिकेत शांतता राखावी.

४) ग्रंथालयासंबंधी तुम्हाला येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी निःसंकोचपणे ग्रंथपाल अगर प्राचार्य यांना भेटावे.

### ❖ विविध उपक्रम :–

महाविद्यालयात अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व कलागुणांना वाव मिळण्यासाठी अभ्यासेत्तर व अभ्यासपूरक कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात.

- महाविद्यालयाचे गौतम वार्षिक नियतकालिक
- वार्षिक क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव
- रक्तदान आणि हिमोग्लोबिन तपासणी शिबीर
- विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास मंच
- विद्यार्थी सहाय्य समिती
- शैक्षणिक सहलींचे आयोजन
- सौ. सुशिलामाई काळे स्मृती गुणवंत पारितोषिके
- सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम
- केमियाड राज्यस्तरीय परीक्षा केंद्र
- वार्षिक पारितोषिक वितरण
- कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना
- प्लेसमेंट सेल व कॅम्पस इंटरव्हू
- विशेष मार्गदर्शन योजना
- व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम
- निर्भय कन्या अभियान
- विद्यार्थी सामूहिक विमा योजना
- विद्यार्थी संसद
- आपत्ती व्यवस्थापन
- अविष्कार संशोधन उपक्रम
- बहिःशाल अभ्यास मंडळ
- महिला तक्रार निवारण समिती
- रॅगिंग प्रतिबंधक समिती
- विद्यार्थी - विद्यार्थिनी वैद्यकीय तपासणी
- माजी विद्यार्थी मेळावा
- पालक मेळावा
- वाचनकट्टा
- प्रसिद्धी विभाग
- हस्तलिखित भित्तीपत्रके, संपदा, वसुंधरा ज्ञान-विज्ञान, वाणिज्य वार्ता इ. नियतकालिके
- वक्तृत्व, वादविवाद, निबंधलेखन आणि काव्य स्पर्धा, वाणिज्य प्रश्नमंजुषा
- सांस्कृतिक मंडळ अंतर्गत विविध सांस्कृतिक उपक्रम

### ❖ विद्यार्थ्यांसाठी वर्तनविषयक सर्वसाधारण नियमावली :–

१) महाविद्यालयाचे आवारात व वर्गात शिस्तीचे योग्य पालन करावे. महाविद्यालयाची शिस्त व नियमांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेश तत्काळ रद्द करण्यात येईल.

२) महाविद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींना गणवेश आणि ओळखपत्र सक्तीचे आहे.

३) विद्यार्थ्याने महाविद्यालयात नियमित हजर राहून सर्व तासांना हजर राहणे बंधनकारक आहे. विद्यापीठ नियमानुसार वर्षाच्या एकूण कामकाजात ८०% हजेरी न भरल्यास परीक्षेस बसण्यास परवानगी मिळणार नाही

तसेच संपूर्ण वर्षाची फी वसूल केली जाईल.

४) प्राचार्यांच्या पूर्व संमतीशिवाय विद्यार्थ्यांना कोणतेही मंडळ अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच बाहेरील व्यक्तीस परवानगीशिवाय परस्पर कोणत्याही समारंभास बोलाविता येणार नाही.

५) महाविद्यालयाच्या संबंधित कोणतीही माहिती, वृत्त विद्यार्थ्यांनी परस्पर वर्तमानपत्रात वा अन्य प्रकारे प्रसिद्धीस देता कामा नये. तसे आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

६) महाविद्यालयाशी संदर्भातील विविध परिपत्रके, परीक्षा, शिष्यवृत्त्या कार्यक्रम या बाबतीची माहिती घेण्याची विद्यार्थ्यांनी सवय लावून घ्यावी. नोटीस न वाचल्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याचे नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

७) ज्या विद्यार्थ्यांकडून नियम व शिस्तीचे उल्लघंन होईल त्यांच्यासाठी दंड करणे, महाविद्यालयातून काढून टाकणे, विद्यापीठ फॉर्म न पाठविणे वा फॉर्म परत बोलाविणे यापैकी कोणतीही दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार महाविद्यालयाच्या प्राचार्यांना राहील.

८) महाविद्यालयाचे वर्ग, ग्रंथालय, वसतिगृहे, आवार व इतर इमारती इत्यादी ठिकाणी स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी महाविद्यालयाप्रमाणेच सर्व विद्यार्थ्यांवर आहे. इमारतीच्या भिंतीवर कोणत्याही प्रकारचा मजकूर लिहिणे. चित्र काढणे, थुंकणे किंवा खराब करणे, महाविद्यालयीन मालमत्तेचे नुकसान करणे अशा स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या विद्यार्थ्यास कमीत कमी रु. १००/- दंड भरावा लागेल किंवा मालमत्तेच्या रकमेएवढी रक्कम भरावी लागेल.

९) महाविद्यालय परिसरात मोबाईल आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१०) महाविद्यालय परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, गुटखा व धुम्रपानास सक्त मनाई आहे. आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

### ❖ प्रवेशासंबंधी महत्त्वाच्या सूचना :-

१) उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीच प्रथम वर्ष कला व वाणिज्य व विज्ञान या वर्गाचे प्रवेश सुरु होतील. इतर वर्गाचे प्रवेश निकाल जाहीर झाल्यानंतर सुरु होतील. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतिय या वर्गाची प्रवेशक्षमता १२० इतकी आहे.

२) प्रवेश घेताना अर्जासोबत मागील विद्यालय **सोडल्याचा मूळ दाखला, मूळ गुणपत्रक आणि त्यांच्या दोन साक्षांकित झेरॉक्स प्रती तसेच फी सवलतीच्या प्रकारासंबंधीची कागदपत्रे (कास्ट सर्टिफिकेट, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड झेरॉक्स)** यांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३) जे विद्यार्थी दुसऱ्या महाविद्यालयातून येतील अशा विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र (टी.सी.) येईपर्यंत तात्पुरता (प्रोव्हीजनल) प्रवेश देण्यात येईल.

४) ओळखपत्र, प्रवेश अर्ज तसेच विद्यापीठ परीक्षा प्रवेश पावती (ॲडमिशन रिसिप्टस्) यासाठी सहा महिने कालावधीच्या आतील कोणतीही सही शिक्का नसलेले तीन रंगीत फोटो जोडावेत.

५) महाविद्यालयाच्या प्रवेशाबाबत व शिस्त संबंधीचे नियम सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

६) प्रवेश शुल्क - शैक्षणिक वर्षात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शन सुचनेनुसार आकारले जाईल.

७) बारावी कला (एच.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कला या शाखेत प्रवेश मिळू शकेल. तसेच डी.एड. व इतर तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कला या विद्याशाखेत प्रवेश मिळेल. बारावी वाणिज्य, विज्ञान किंवा किमान कौशल्य उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना वाणिज्य किंवा कला शाखेत प्रवेश मिळेल.

८) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपल्या तालुक्याच्या तहसीलदाराची सही असलेल्या जातीच्या दाखल्याच्या दोन झेरॉक्स प्रती आणाव्यात.

९) प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकीय तपासणी अनिवार्य आहे.

१०) गुणपत्रकाची मूळप्रत विद्यापीठाकडून उच्च प्रवेश प्रमाणपत्र मिळाल्यारवेरीज विद्यार्थ्यांना परत मिळणार नाही.

११) महाविद्यालयाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सूचना, नियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील. महाविद्यालयात शिस्तीचे काटेकारपणे पालन विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहे. महाविद्यालयात बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यास शासन करण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना अखेरचा असेल.

**१२) एकदा घेतलेला विषय प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय बदलता येणार नाही.**

**१३) कोणत्याही वर्गात घेतलेला प्रवेश रद्द करण्यासाठी विद्यापीठ नियमानुसार फी ची कपात केली जाईल. तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यास सदरच्या नियमानुसार प्रवेश रद्द करतांना पुणे विद्यापीठ नियमानुसार फी भरावी लागेल.**

## ❖ कला शाखा अभ्यासक्रम ❖

(मराठी आणि इंग्रजी माध्यम)

| १) प्रथम वर्ष कला<br>(एफ.वाय.बी.ए.)<br>**Choice Based Credit System Semester I & II** | २) द्वितीय वर्ष कला<br>(एस.वाय.बी.ए.)<br>**Choice Based Credit System Semester III & IV** | ३) तृतीय वर्ष कला<br>(टी.वाय.बी.ए.)<br>**(2013 Pattern)** |
|---|---|---|
| ग्रुप A - इंग्लिश (अनिवार्य) (Compulsory) (Paper 1 & 2)<br>ग्रुप B - मराठी (Paper 1 & 2)<br>ग्रुप C - हिंदी / ऑप.इंग्लिश (Paper 1 & 2)<br>ग्रुप D - अर्थशास्त्र (Paper1 & 2)<br>ग्रुप E - राज्यशास्त्र (Paper1 & 2)<br>ग्रुप F - इतिहास (Paper 1 & 2)<br>ग्रुप G - भूगोल (Paper 1 & 2)<br><br>ग्रुप B - पासून पुढील कोणत्याही पाच विषयांची निवड करावी.<br>• शारीरिक शिक्षणाची परीक्षा दोनही सत्रात अनिवार्य राहील.<br>• लोकशाही निवडणुका आणि सुशासन हा कोर्स अनिवार्य राहील. | I) अनिवार्य इंग्लिश (Compulsory)<br>II) खालीलपैकी एक विषय Special Subject विशेष स्तरावर घ्यावा लागेल.<br>• मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र प्रत्येक सत्रानुसार Paper I & II)<br>III) खालीलपैकी कोणतेही दोन विषय (स्पेशल विषय सोडून) General Level सामान्य स्तरावर (G2) घ्यावे लागतील.<br>• मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल प्रत्येक सत्रानुसार Paper III & IV)<br><br>• पर्यावरण जाणीव व जागृती हा विषय दोनही सत्रात अनिवार्य राहील.<br>• प्रत्येक स्पेशल विषयानुसार Value added Course अनिवार्य आहेत. | I) अनिवार्य इंग्लिश (Compulsory)<br>II) तृतीय वर्ष कला या वर्गासाठी द्वितीय वर्षात निवडलेल्या एकुण सहा विषयांच्या अभ्यासपत्रिका (पेपर्स) पूर्ण करावयाचे आहेत. या वर्गात प्रवेश घेताना प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका जोडावी. |

# ❖ वाणिज्य शाखा अभ्यासक्रम ❖

(मराठी आणि इंग्रजी माध्यम)

| F.Y.B.Com. Choice Based Credit System Semester I & II | S.Y.B.Com. Choice Based Credit System Semester III & IV | T.Y.B.Com. (2013 Pattern) |
|---|---|---|
| **Compulsory Group/Subjects**<br>1) Compulsory English<br>2) Financial Accounting<br>3) Business Economics (Micro)<br>4) Computer Concepts & Application<br>OR<br>4) Mathematics & Statistics<br>**Optional Group**<br>5) Marketing & Salesmanship<br>5) Organizational Skill Development<br>OR<br>6) Business Environment & Entrepreneurship<br>6) Banking & Finance<br>**Optional Group**<br>7) Marathi<br>OR<br>7) Hindi<br>**(Each Subject Paper I & II)**<br>• शारीरिक शिक्षणाची परीक्षा दोनही सत्रात अनिवार्य राहील.<br>• Compulsory Two Value added course in I of II semester<br>• लोकशाही निवडणुका आणि सुशासन हा कोर्स अनिवार्य राहील. | **Compulsory Group/Subjects**<br>1) Business Communication<br>2) Corporate Accounting<br>3) Business Economics (Macro)<br>4) Business Management<br>5) Elements of Company Law<br><br>**Optional Group**<br>6) Marketing Management (Paper - I)<br>OR<br>6) Cost and Works Accounting (Paper - I)<br>**(Each Subject Paper III & IV)**<br><br>**Compulsory Group**<br>7) Awarness Environmental Course is compulsory in III & IV semester | **Compulsory Group/Subjects**<br>1) Business Regularly Frame (M.Law)<br>2) Advance Accounting<br>3) Auditing & Taxation<br>4) Indian & Global Economic Development<br>OR<br>4) International Economics<br><br>**Optional Group**<br>5) Marketing Management (Paper - II)<br>OR<br>5) Cost and Works Accounting (Paper - II)<br><br>**Optional Group**<br>6) Marketing Management (Paper - III)<br>OR<br>6) Cost and Works Accounting (Paper - III) |

### ❖ प्रात्यक्षिक परीक्षा (Practical Exam) –

| | | |
|---|---|---|
| **1.** | **F.Y.B.Com.** | 1. Financial Accounting (Semi I & II) |
| **2.** | **S.Y.B.Com.** | 1. Business Communication (Semi I & II) |
| | | 2. Marketing Management (Paper I) (Sem. III & IV) |
| | | 3. Cost & Works Accounting (Paper I) (Sem. III & IV) |
| **3.** | **T.Y.B.Com.** | 1. Auditing & Taxation |
| | | 2. Marketing Management (Paper II & III) |
| | | 3. Cost & Works Accounting (Paper II & III) |

**Practical Exam is compulsory for 20 marks for above subject in each semester**

# ❖ विज्ञान शाखा अभ्यासक्रम ❖

**१) प्रथम वर्ष (एफ.वाय.बी.एस्सी.)**

इ. १२ वी सायन्य पास झालेल्या व किमान कौशल्य (MCVC) विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येईल. खालील विषयांच्या ग्रुप मधील कोणतेही चार विषय (F.Y.B.Sc.) या वर्गाकरिता निवडता येतील.

D.Pharm पास झालेल्या विद्यार्थ्यांना S.Y.B.Sc. या वर्गात प्रवेश घेता येईल.

| प्रथम वर्ष विज्ञान<br>**F.Y.B.Sc.**<br>**Choice Based Credit System**<br>**Semester I & II** | द्वितीय वर्ष विज्ञान<br>**S.Y.B.Sc.**<br>**Choice Based Credit System**<br>**Semester III & IV** | तृतीय वर्ष विज्ञान<br>**T.Y.B.Sc.**<br>**(2013 Pattern)** |
|---|---|---|
| **Any One Group of the following**<br>1) Physics, Chemistry Mathematics, Botany<br>2) Physics, Chemistry, Botany, Zoology<br>(Paper I of II)<br><br>● **Important :**<br>● शारीरिक शिक्षणाची परीक्षा दोनही सत्रात अनिवार्य राहील.<br>● Internal Exam ही Semester प्रमाणे वर्षातून २ वेळा १५ गुणांची राहील.<br>● प्रत्येक विषयाची विद्यापीठ लेखी परीक्षा दोनही सत्रात ३५ गुणांची असेल.<br>● प्रत्येक सत्रात Practical Exam ५० गुणांची अनिवार्य राहील.<br>● लोकशाही, निवडणुका आणि सुशासन हा कोर्स अनिवार्य राहील. | 1) Compulsory Marathi<br>**2) Any One Group of the following**<br>a) Physics, Chemistry Mathematics<br>b) Physics, Chemistry, Botany<br>c) Chemistry, Botany, Zoology<br>(Paper III of IV)<br><br>**Important :**<br>● Environmental Awareness is compulsory subject at S.Y.B.Sc. Level<br>● Internal Exam. ही Semester प्रमाणे वर्षातून दोन वेळा आणि १५ गुणांची राहील.<br>● प्रत्येक सत्रात Practical Exam. 50 गुणांची अनिवार्य राहील.<br>● प्रत्येक विषयाची विद्यापीठ लेखी परीक्षा दोनही सत्रात ही ३५ गुणांची असेल. | The student shall offer one subject as the princiapl subject out of the three subjects offered at S.Y.B.Sc.<br>Principal Subjects<br>1) Physics<br>2) Chemistry<br>3) Mathematics<br>4) Botany<br>5) Zoology<br><br>Note : The student offering physics (Pri.) at T.Y.B.Sc. shall have to offer Mathematics at F.Y.B.Sc. Level<br><br>Internal Exam. ही Semester प्रमाणे वर्षातून दोन वेळा आणि १० गुणांची राहील.<br><br>Practical Exam. 100 गुणांची असून अनिवार्य राहील.<br><br>प्रत्येक विषयाची विद्यापीठ लेखी सत्र परीक्षा ही ४० गुणांची असेल. |

### ❖ परीक्षेसंबंधी विशेष सूचना –

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सुरु केलेली परीक्षा पद्धत, विद्यापीठ परीक्षांचे गुण पद्धत वेळोवेळी जाहीर केले जाईल.

२. विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेस बसण्याकरिता ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

३. द्वितीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गासाठी पर्यावरण जाणीव व जागृती हा विषय अनिवार्य आहे.

४. F.Y./S.Y./T.Y.B.A., B.Com., B.Sc. ऑनलाईन परिक्षा फॉर्म भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. www.exam.unipune.ac.in या लिंकचा आधार घेणे.

### ❖ विद्यापीठ प्रवेश पात्रतेसंबंधी नियम –

प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी मुदतीत विद्यापीठ पात्रता फॉर्म भरणे आवश्यक आहे. याबाबत वेळोवेळी सूचना काचफलकावर लावल्या जातात. विद्यापीठ पात्रता फॉर्म भरुन विद्यापीठ पात्रता (Eligibility) केल्याशिवाय विद्यापीठ परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

## ❖ पालकांना नम्र विनंती ❖

विद्यार्थी, शिक्षक व पालक हे शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचे घटक आहेत. विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार पालकांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होत नाहीत.

आपल्या पाल्याची गुणवत्ता वाढावी व त्यांच्यावर उत्तम संस्कार व्हावेत असा महाविद्यालयाचा नेहमीच प्रयत्न असतो. या संदर्भात पालकांनी जागरुक राहून वेळोवेळी महाविद्यालयाशी संपर्क साधला तर विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ते निश्चितच उपयुक्त ठरेल. आपला पाल्य प्रात्यक्षिक परीक्षेस, लेखी परीक्षेस अथवा मौखिक परीक्षेस तसेच दैनंदिन तासांना हजर राहतो किंवा नाही याकडे पालकांनी लक्ष द्यावे. पाल्याच्या शिक्षणात काही अडचणी उपस्थित झाल्यास पालकांनी प्राचार्यांशी त्या मनमोकळेपणाने बोलून सोडवून घ्याव्यात. विद्यार्थी / विद्यार्थिनी, पालक आणि प्राध्यापक यांच्या सहयोगातूनच संस्कारपूर्ण व सकस शिक्षण मिळू शकते. यावर आमचा विश्वास आहे. यासाठी पालकांनी वर्षातून किमान दोन वेळा महाविद्यालयात येऊन प्राचार्यांशी किंवा संबंधित प्राध्यापकांशी आपल्या पाल्याच्या प्रगतीविषयी चर्चा करावी अशी आमची मनापासून इच्छा आहे. महाविद्यालय वेळोवेळी पालकांशी सुसंवाद साधण्यासाठी पालक मेळाव्याचे आयोजन करते. अशा वेळी पालकांनी आवर्जून उपस्थित रहावे अशी आग्रहाची विनंती. आहे.

## ❖ शुल्क सवलती व शिष्यवृत्ती ❖

**एस.सी./एस.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी./मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती फॉर्मसाठी खालीलप्रमाणे कागदपत्र तयार ठेवावीत व सदर शिष्यवृत्ती फॉर्म विद्यार्थ्याने स्वतः ऑनलाईन पुढील वेबसाईटवर भरावा.**

**http://mahaeschol.maharashtra.gov.in**

**एक फ्रेश फोटोसह बी.सी.स्कॉलरशीप फॉर्म सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

१. जातीचा दाखला झेरॉक्स साक्षांकित केलेली प्रत.

२. उत्पन्नाचा मूळ दाखला. (तहसीलदाराकडील)

३. शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

४. मागील वर्षाची गुणपत्रकाची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

५. वडील हयात नसतील तर मृत्यूचा दाखला झेरॉक्स प्रत तसेच अशा विद्यार्थ्यांनी आईच्या नावाने फॉर्म भरावा. उत्पन्नाचा दाखला आईच्या नावाने आणावा. आई व वडील हयात नसतील तर त्यांचे मृत्यूचे दाखले जोडावेत.
६. वडील नोकरी करीत असतील तर त्या खात्याचा सविस्तर उत्पन्नाचा दाखला जोडावा. अशा विद्यार्थ्यांनी तहसीलदार यांच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला जोडण्याची आवश्यकता नाही.
(मूळ पगार + महा.भत्ता + प्रवास भाडे + घरभाडे) (१ एप्रिल ते ३१ मार्च अखेर १२ महिन्याचे एकूण उत्पन्न)
७. मागील आदेश क्रमांक (शिष्यवृत्ती मिळत होती किंवा नाही.)
८. गॅप असेल तर गॅप सर्टिफिकेट द्यावे लागेल.
९. इतर जिल्ह्यातून या जिल्ह्यात आलेले असाल तर जिल्हा बदल प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदांची पूर्तता करावी.
१०. राष्ट्रीयकृत बँक खाते नंबर (युनियन बँक, कोळपेवाडी)
११. आधार कार्ड बँक खात्याशी संलग्नीकरण करणे.

**❊ बी.सी.फ्री शीप अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

१. तहसीलदाराकडील जातीचा दाखला साक्षांकित झेरॉक्स प्रत.
२. शाळा सोडल्याची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
३. गुणपत्रकाची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
४. उत्पन्नाचा (दाखला तहसिलदार यांचेकडील) किंवा नोकरी असेल तर संबंधित खात्याचा सविस्तर दाखला.
५. गॅप असेल तर गॅप सर्टिफिकेट इत्यादी.

**❊ टीप –** सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी वरीलपैकी कोणताही एक फॉर्म भरणे आवश्यक आहे. अन्यथा त्या विद्यार्थ्यास महाविद्यालयाची सर्व फी भरावी लागेल त्याच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**❊ (ओपन) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

१. प्रतिज्ञापत्र (अपत्य)
२. शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत
३. दहावीचे गुणपत्रक झेरॉक्स
४. बारावीचे गुणपत्रक झेरॉक्स
५. मागील वर्षाचे गुणपत्रक
६. डोमेसाईल सर्टिफिकेट झेरॉक्स
७. मा. तहसीलदारांचा उत्पन्नाचा दाखला
८. आधार कार्ड बँकेत लिंक केल्याची पावती झेरॉक्स
९. बँक पासबुक झेरॉक्स
१०. आधार कार्ड झेरॉक्स
११. प्रवेश पावती झेरॉक्स
१२. गॅप असल्यास (रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर) गॅप सर्टिफिकेट झेरॉक्स

## शुल्क सवलती व शिष्यवृत्तीसंबंधी विशेष माहिती :-

| शुल्क सवलती व शिष्यवृत्ती | शुल्क सवलती व शिष्यवृत्ती | लागणारी प्रमुख कागदपत्रे |
|---|---|---|
| १)राष्ट्रीय गुणवत्ता | १) एच.एस.सी. परीक्षेत ७०% किंवा अधिक गुण असावेत.<br>२) वरील विद्यार्थ्यांतून एच.एच.सी. बोर्ड शिष्यवृत्तीसाठी निवड करते.<br>३) या शिष्यवृत्त्या प्रगती नुतनीकरणासाठी अहवाल प्रवेशाच्या वेळी द्यावा. | १) गुणपत्रकाच्या खऱ्या नकलांच्या दोन प्रती<br>२) उत्पन्नाच्या योग्य नमुन्यात दाखला- दोन प्रती |
| २)राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्त्या | १२ वी परीक्षेत ज्यांना ७०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण असतील त्यांना अर्ज करता येईल. | गुणपत्रकाच्या खऱ्या नकलांच्या दोन प्रती |
| ३)राज्य सरकार गुणवत्ता शिष्यवृत्ती | इ. १० वी व १२ वी च्या मार्च/एप्रिल च्या परिक्षेत ७०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असतील त्यांना अर्ज करता येईल. | गुणपत्रकाच्या खऱ्या नकलांच्या दोन प्रती आधारकार्डच्या खऱ्या नकलांच्या दोन प्रती |
| ४)अपंग मुलांना शिष्यवृत्ती | जे विद्यार्थी/विद्यार्थिनी अपंग असतील त्यांनी त्या संबंधीचा अर्ज सिव्हील सर्जनकडून तपासणी करुन घ्यावयाचा आहे. एफ.वाय.बी.ए./बी.कॉम या वर्गात प्रवेश घेताना अर्ज करावयाचा आहे. | १) मेडीकल सर्टिफिकेट योग्य नमुन्यात<br>२) तहसीलदाराकडून उत्पन्नाचा दाखला<br>३) गुणपत्रिकेची झेरॉक्स |
| ५)हिंदी शिष्यवृत्ती | डिग्री कोर्सला हिंदी विषय घेणाऱ्या बी.ए. भाग १ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करता येतील. गेल्या वार्षिक परीक्षेत हिंदी विषयात शे. ७०% च्या वर गुण असावेत. | गुणपत्रकाच्या खऱ्या नकलांच्या दोन प्रती |

## शुल्क सवलती व शिष्यवृत्तीसंबंधी विशेष माहिती :-

| शुल्क सवलती व शिष्यवृत्ती | शुल्क सवलती व शिष्यवृत्ती | लागणारी प्रमुख कागदपत्रे |
|---|---|---|
| ६) स्वातंत्र सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती | राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन,आझाद हिंद सेना, गोवा मुक्ती व भूतपूर्व हैद्राबाद संसदीत सरकार स्थापन करण्याबाबत ज्यांनी भाग घेतला अशांच्या मुला-मुलींना, नातवांना (मुलाचे मुलास, मुलगा मयत झाला असल्यास) फी माफी व शिष्यवृत्ती मिळते. अर्ज फक्त नवीन विद्यार्थ्यांना द्यावयाचे आहेत. गतवर्षी ज्यांना ही शिष्यवृत्ती होती त्यांनी प्रगती अहवालाची पूर्तता करावी. | १. ठराविक नमुन्यात करारनामा<br>२. सन्मानपत्राची खरी नक्कल<br>३. उत्पन्नाचा दाखला<br>४. गुणपत्रकांच्या खऱ्या नकला<br>५. मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळत असल्यास प्रगती अहवाल सादर करावा. |
| ७) माजी सैनिकांच्या मुला-मुलींना असणारी शिष्यवृत्ती | माजी सैनिकांच्या मुला-मुलींसाठी | १. शासकीय दाखला<br>२. गुणपत्रकांच्या दोन प्रती |
| ८) आर्थिक दुर्बल घटक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य | १. मागील परीक्षेत कमीत कमी ६०% गुण<br>२. वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>३. इतर कोणत्याही सवलती न मिळणाऱ्यालाच ही सवलत मिळते. | १. उत्पन्नाचा दाखला<br>२. गुणपत्रक छायांकित प्रत<br>३. कुटुंब प्रमुखावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीची संख्या<br>४. अर्जदार पालकांचे शिक्षण इ. |
| ९) विद्यार्थिनीसाठी क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती | १. मागील परीक्षेत कमीत कमी ५०% गुण<br>२. वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>३. इतर कोणतीही शिष्यवृत्ती न घेणाऱ्या विद्यार्थीनींसाठी<br>४. महाविद्यालयातील फक्त १० विद्यार्थीनींसाठी | १. उत्पन्नाचा दाखला<br>२. गुणपत्रक छायांकित प्रत<br>३. रहिवासी दाखला |
| १०) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती | मुस्लीम, जैन, बुद्ध, ख्रिश्चन, पारशी व इतर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी | १. उत्पन्नाचा दाखला<br>२. गुणपत्रक छायांकित प्रत<br>३. रहिवासी दाखला |

## MEASURES TO PREVENT RAGGING IN EDUCATIONAL INSTITUTIONS

With reference to the order from Director, Higher Education, Maharashtra State the Board of Students' Welfare issued a circular on 6th January, 2009 to all affiliated colleges and recognized institutes of University of Pune to implement the measures suggested to prevent ragging in educational institute.

The Principals of affiliated colleges and Heads of recognized institutes were also requested to report to the University in this regard. Unfortunately very few colleges and institutes have made the compliance.

The Hon'ble Supreme Court of India in its Judgment and Order dated 11.02.2009 have suggested the measures to prevent ragging in Educational institutes. All affiliated colleges and recognized Institutes are requested to follow these measures very strictly and submit the action taken report to this office on or before 25th May, 2009.

1. In the prospectus of the Higher Educational Institutions, it should be mentioned that if any incident of ragging comes to the notice of the authority concerned, the accused student will be given an opportunity to explain and if his explanation is not satisfactory, the authority would expel him from the institution. The number of cases of ragging and punishment given by the educational institutions in the previous academic year should also be incorporated in the prospectus of Higher Educational Institutions.
2. To constitute anti ragging committees and squads to check ragging and to publish names and telephone numbers of officials to contacted by the students in case of ragging.
3. To conduct counseling sessions and orientation courses for senior and fresh students.
4. All institutions should be whatever they can by ensuring punishment to the students found guilty of ragging, giving wide publicity to such punishments to act as a deterrent, strict enforcement of the various measures of preventing ragging.
5. To incorporate in admission notices/ advertisements, appropriate messages regarding 'Zero tolerance' towards ragging.
6. To undertake audio-video campaign at the commencement of the new academic session to prevent ragging.
7. To make efforts to publicize and sensitize students regarding the menace of ragging,
8. To generate awareness amongst students through student unions about the bad effects of ragging.
9. In appropriate cases, if the authorities are prima facie satisfied about the errant act of any student they can, pending final decision, suspend the student from the institutions and hostel, if any and given opportunity to him to have his say. The Police shall be informed immediately and Criminal law be set in to motion.
10. If it is found that any educational institution is trying to shield the errant students its grant - in- aid should be reduced and in serious cases, should be denied.

सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर

KARMAVEER SHANKARRAO KALE EDUCATION SOCIETY'S

# SAU. SUSHILAMAI KALE ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE, GAUTAMNAGAR

Photo

Signature

Student's Name : ______________________________

______________________________

Father's Name : ______________________________

______________________________

Address :A/p. ______________________________

Tal. ______________________________

Dist. ______________________________

Phone/Mobile No. ______________________________

Date of Birth ______________________________

Class ______________ Special Subject ______________

Roll No. ______________________________

Blood Group ______________________________

(ही स्लीप प्रवेश घेतल्यानंतर त्वरीत ग्रंथालयात ग्रंथपालाकडे जमा करावी.)

दिनांक : / /२०

# ❖ रॅगिंग संबंधीचे हमीपत्र ❖

प्रति,

**मा.प्राचार्या,**

**सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर**

## विषय : रॅगिंगच्या संबंधिचे हमीपत्र

महोदय,

माझा पाल्य श्री. ______________________ वर्ग ____________

रा. ______________ ता. ______________ जि. ______________

या वर्गामध्ये प्रवेश घेत आहे. मी स्वतः व माझ्या कुटुंबातील इतर सर्व जाणकार सदस्यांनी रॅगिंग विषयीची माहिती, कायदेशीर बाबी, दंड व सजा याच्याशी संबंधित सर्व गोष्टी माहिती करुन घेतलेल्या आहेत. त्याप्रमाणे आम्ही सर्वांनी आमचा पाल्य श्री. ______________________
यास/हीस सर्व गोष्टी समजून सांगितल्या आहे. त्यामुळे तो/ती कोणत्याही प्रकारच्या रॅगिंगशी संबंधित घटनामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी होणार नाहीत. तसेच तो/ती रॅगिंगच्या कृतींना प्रोत्साहीत करणार नाही. किंबहुना तो/ती रॅगिंगच्या घटनांची पूर्व कल्पना महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व आम्हा पालकांना देईल अशी हमी पालक या नात्याने आम्ही आपणास देत आहोत.

तथापि तो/ती रॅगिंगशी संबंधित घटकांत दोषी आढळल्यास होणाऱ्या नुकसानीस आम्ही जबाबदार राहु अशी लेखी हमी देत आहोत.

कृपया त्यास/तीस प्रवेश द्यावा ही विनंती.

| साक्षीदार सही व नाव | विद्यार्थी/विद्यार्थीनी नाव व सही<br>फोन / मोबाईल | पालकाचे संपूर्ण नाव व सही<br>फोन / मोबाईल |
|---|---|---|

**प्राचार्या**
**सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य**
**व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर**

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे No.

# सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर

Website : www.sskacs.kskes.in

## प्रवेश अर्ज २० - २०

Principal's Remarks
Admitted / Admitted Provisionaly

Date

Principal
S.S.K.A.C.S.College

Admission Incharge

Class Roll No.
F.Y.
S.Y.
T.Y.
E.B.C./B.C./P.T./F.F./Paying/T.W./Open

Photo

**मा. प्राचार्या,**

**सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अ.नगर**

महोदय,

मी खाली सही करणार श्री./कु. ______________________

आपल्या महाविद्यालयात ______________ या वर्गामध्ये प्रवेश घेऊ इच्छित आहे.

महाविद्यालयाच्या माहितीपत्रकातील सर्व नियमांशी मी सहमत आहे. त्याचे मी काटेकोरपणे व प्रामाणिकपणे पालन करीन तरी मला महाविद्यालयात प्रवेश द्यावा ही विनंती.

माननीय कुलगुरु व विद्यापीठातील इतर अधिकारी, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्था प्रमुख व संस्थेचे इतर अधिकारी यांच्या शिस्तविषयक कायदेशीर अधिकारात अधिन राहून त्यांनी केलेल्या नियमांचे मी पालन करीन.

दिनांक - / /२० **आपला / आपली नम्र**

**विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनीची सही**

E-mail ID : ______________________ **संपर्क / मोबाईल नंबर**

---

## -: वैयक्तिक माहिती :-

१) संपूर्ण नांव (देवनागरीत) ______________________

आडनांव नांव वडिलांचे नांव

English ______________________

Surname Name Father's Name

२) वडिलांचे/पालकांचे नाव ______________________

३) आईचे संपूर्ण नाव ______________________

४) कायमचा पत्ता ______________________ पालकांचा फोन नं.

स्थानिक पत्ता - गाव __________ पोस्ट __________ तालुका __________ जिल्हा __________

५) आधार नं. : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ बँक खाते नं : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

६) जन्मतारीख (अंकी) (अक्षरी ______________________ )

७) जन्मस्थळ __________ तालुका __________ जिल्हा __________

८) छंद व आवडणारे खेळ ______________________

९) स्त्री / पुरुष __________ १०) विवाहित / अविवाहित __________

११) धर्म / जात ______________________

१२) इ-मेल ______________________

| परीक्षा उत्तीर्ण | यापूर्वी शिकत असलेल्या विद्यालय / महाविद्यालयाचे नांव | उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ/ विद्यापीठ | केंद्र व आसन क्रमांक | एकुण गुण | शेकडा गुण | घेतलेले विषय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ वी विज्ञान/ कला/वाणिज्य/ किमान कौशल्य | | | | | | | |
| प्रथम वर्ष बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. | | | | | | | |
| द्वितीय वर्ष बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. | | | | | | | |
| तृतीय वर्ष बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. | | | | | | | |

टी.सी.अर्ज मिळाल्याची सही
**T.C. Clerk**

२०     -२०     प्रवेश घ्यावयाचा वर्ग     घेतलेले विषय

१. ________  २. ________

३. ________  ४. ________

५. ________  ६. ________

७. ________  ८. ________

**टीप : ऑगस्ट पूर्वी प्राचार्यांच्या लेखी परवानगीशिवाय एकदा घेतलेले विषय बदलता येणार नाहीत.**

## -: वडिलांचे / पालकांचे निवेदन :-

मी आपल्या महाविद्यालयाचे नियम समजावून घेतले आहेत. माझा पाल्य महाविद्यालयाचे सर्व नियम, अटी व शिस्तीचे पालन करील अशी मी हमी देतो. त्याचे महाविद्यालयीन आवश्यक ते शुल्क व इतर पूर्तता करण्याची माझी जबाबदारी पार पाडीन. माझ्या पाल्याच्या प्रगतीच्या दृष्टीने महाविद्यालय करीत असलेल्या सर्व प्रयत्नास मी सहकार्य करीन. माझ्या पाल्याने खालील बाबींची समाधानकारक पूर्तता न केल्यास त्याला / तिला महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल याची मी नोंद घेत आहे. तसे न झाल्यास महाविद्यालय घेईल तो निर्णय मला मान्य राहील. खालील बाबींची माझा पाल्य पूर्तता करील याची मी ग्वाही देतो.

१. पाल्याची समाधानकारक वर्तणूक
२. पाल्याची नियमित उपस्थिती
३. वर्षभरातील नैमित्तिक कामकाज
४. प्रात्यक्षिकास नियमित हजेरी
५. परीक्षेतील समाधानकारक प्रगती
६. महाविद्यालयीन परिसरात शिस्तपूर्ण वर्तन

या महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व तद्नुषंगिक कार्यक्रम होणार नाहीत याची मला कल्पना आहे.

स्थळ :

दिनांक :    /    /२०

वडिलांची / पालकांची सही

## -: कार्यालयाचा निर्णय :-

श्री./कु. ________________

यांना या वर्गात तात्पुरता प्रवेश देण्यात आलेला आहे. प्रवेशासाठी लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची योग्य ती पूर्तता केल्यानंतरच हा प्रवेश कायम करण्यात येईल.

**कार्यालय अधिक्षक**     **लेखनिक**     **प्रवेश कमिटी**     **प्राचार्या**

दिनांक    /    /२०